CMYK

मूलभूत हक्कांचे संरक्षण करणारे राज्य मानवी हक्क आयोग >> पान 2

महाराष्ट्र राज्य विकास कर्ज २०२५ ची ८.१३% टक्के दराने परतफेड >> पान 3

लोकनेते स्व गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त खळेगाव येथे स्मारकाचे उद्घाटन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार >> पान 4

**सुविचार**

ध्येय निश्चित करा आणि त्यासाठी प्रयत्न करा.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 123 ■ शनिवार, दि. 14 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



झुकेगा नही साला! आरामात कॉफीचा घोट घेतला, बायकोला किस केलं अन् अल्लू अर्जुन पोलिसांच्या ताब्यात

आतील पान

# महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी विविध विकासांच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याला देशातील ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनवणार आहोत. गेल्या वर्षी राज्याने अर्ध्या ट्रिलियनचे उद्दिष्ट पार केलेले आहे. आता २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट पूर्ण करु असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

जिओ वर्ल्ड कन्वेंशन सेंटर, बिकेसी, वांद्रे येथे दि. १३ ते १५ डिसेंबर या कालावधीत वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे, या परिषदेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ झाला असून यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते.

यावेळी माजी मंत्री तथा आमदार मंगल प्रभात लोढा, वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक स्वामी विद्यानंद, अध्यक्ष राजेश शर्मा, प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै, सहसचिव शैलेश त्रिवेदी यासह जगातील विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहेच मात्र भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी बनेल. वर्ल्ड हिंदू इकॉनॉमिक परिषदेने भारताच्या संस्कृतीवर आणि विविध क्षेत्रातील विकासाच्या तत्वावर आधारित वेगवेगळ्या संकल्पना मांडल्या आहेत. पाश्र्चिमात्य संस्कृती आणि आपल्या संस्कृतीमध्ये मूलभूत अंतर आहे. पाश्र्चिमात्य संस्कृती मध्ये जो कोणी सक्षम आहे तोच विकास करू शकतो मात्र आपल्या संस्कृतीमध्ये प्रत्येक जन्मलेला व्यक्तीला आपला विकास करण्याचा हक्क आणि अधिकार आहे .

भारताच्या नेत्रदीपक प्रगतीने सर्व जगाला थक्क करून टाकले आहे. सर्वाधिक गतीने पुढे येणारा भारत जगात तिसरी महासत्ता म्हणून पुढे येत आहे. जगातील लोक म्हणत होते की एवढे मोठी लोकसंख्या असलेला देश कशाप्रकारे प्रगती करू शकतो ? परंतु देशातील कुशल मनुष्यबळ हेच विकासाचे महत्त्वाचे साधन असून प्रत्येकाला विकासामध्ये सोबत घेऊन जात आहोत असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र आज मोठ्या गतीने पुढे जात आहे. महाराष्ट्राला देशातील सर्वाधिक विकसित राज्य बनवण्यासाठी सल्लागार कमिटीची स्थापना केली असून या समितीच्या माध्यमातून महाराष्ट्र कोणकोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकतो याचा अभ्यास करुन यावर आधारित महाराष्ट्राच्या विकासाची धोरणे आखली जात आहेत. जागतिक पातळीवरती महाराष्ट्र विकासाला पूरक एक साखळी बनवत आहे. यामध्ये लॉजिस्टिक धोरण, सर्वाधिक गतिमान रस्त्यांचे जाळे बनवण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. नागपूर – मुंबई समृद्धी महामार्ग ७०० किलोमीटर असून जो १६ जिल्ह्यांना जोडला असून हा महामार्ग थेट जेएनपीटी या बंदराला जोडला आहे, यातून अत्यंत चांगल्या पुरवठा दारांची साखळी निर्माण होत आहे. रस्ते, विमान





वाहतूक, बंदर विकास या पायाभूत सुविधा सक्षम करण्यावरती राज्य शासन भर देत आहे. देशासोबतच महाराष्ट्राला मेरीटाईमची ताकद बनवण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ध्यास आहे. सन २०१४ पासून प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाला गती दिली आहे असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगीतले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाच्या विकासाला गती देणारे नवीन धोरण बनवलेले आहेत. भारताने गेल्या दहा वर्षात २५ कोटी लोकांना दारिद्र्यरेषेच्या वरती आणलेले आहे. सन २०३० पर्यंत भारताला पाच ट्रिलियन अर्थव्यवस्था बनवणार आहोत. हे उद्दिष्ट आम्ही २०२८ पर्यंतच पूर्ण करू. जागतिक पातळीवरील आर्थिक संस्थांच्या माध्यमातून भारत देश सात ट्रिलियन इकॉनॉमिचे किंवा नऊ ट्रिलियनचेही उद्दिष्ट गाठू शकतो असे सर्वेक्षण समोर येत आहे. यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावरती आधारित विकासावर अधिक भर देण्यात येत आहे. सन २०२० च्या देशपातळीवरील विकास सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र देशात भूजल पातळी मध्ये देखील प्रथम होते. राज्यातील वनांचे आच्छादन देखील जास्त आहे. ग्रीन ऊर्जा, नदीजोड प्रकल्प यातून शाश्र्वत विकासावरती राज्य शासन भर देत आहे असेही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते पद्मश्री टी. व्ही. मोहनदास पै म्हणाले की, देशामध्ये उपलब्ध मनुष्यबळ हे आपल्या विकासाचे बलस्थान आहे. विकसित भारत हेच भारताचे भवितव्य आहे. भारतीय संस्कृती हा विचार आहे तो जगात पुढे नेणे गरजेचे आहे. युवांना उत्कृष्ट दर्जाचे शिक्षण देणे, आरोग्य, शिक्षण, डिजिटल तंत्रज्ञान, महिला सबलीकरण यावरती काम होणे गरजेचे आहे.

## खाजगी रुग्णालयात मोठी दुर्घटना, आग लागल्याने ७ जणांचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी** : तामिळनाडूच्या डिंडीगुलमध्ये गुरूवारी रात्री एक भीषण दुर्घटना घडली. येथील एका खाजगी रुग्णालयात आग लागल्याने ७ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. मृतांमध्ये एक मुलगा आणि ३ महिलांचा समावेश आहे. जखमींमध्ये तिघांची स्थिती गंभीर आहे. या सर्वांना दुसऱ्या रुग्णालयात शिफ्ट करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही दुर्घटना गुरूवारी रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली. सूचना मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. मिडिया रिपोर्टनुसार रुग्णालयाच्या आत अडकलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी अग्निशमन दलाच्या ३ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या होत्या. यानंतर लोकांना बाहेर काढून १० सरकारी ॲम्ब्युलन्स आणि ३० खाजगी ॲम्ब्युलन्सच्या मदतीने दुसऱ्या रुग्णालयात शिफ्ट करण्यात आले.

दुर्घटनेप्रकरणी कलेक्टर यांचे विधान

या दुर्घटनेप्रकरणी जिल्हा कलेक्टर यांचे विधान आले आहे. त्यांनी एजन्सीला सांगितले की १० वाजण्याच्या सुमारास एका खाजगी रुग्णालयात आग लागली होती. रुग्णांना वाचवून जवळच्या सरकारी आणि खाजगी रुग्णालयात दाखल केले आहे. मृतांबाबतची माहिती डॉक्टरांनी पुष्टी दिल्यानंतरच दिली जाईल.

## आरबीआयला धमकीचा मेल; रशियन भाषेचा वापर! पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर

नवी दिल्ली : सध्या धमकीच्या कॉल्सची संख्या सातत्याने वाढत चालली आहे. शाळा, विमानतळ अशा ठिकाणी बॉम्ब ठेवल्याचे किंवा ही ठिकाणे बॉम्बने उडवण्याच्या धमक्या मिळत आहेत. नुकतेच दिल्लीतील शाळांना उडवण्याची धमकी मिळाली होती. अशातच आता आरबीआयलाही धमकीचा मेल आला आहे.

रशियन भाचेत काल दुपारच्या सुमारास आरबीआयच्या अधिकृत वेबसाईटवर स्फोटकांनी उडवण्याच धमकीचा मेल आला. धमकीचा मेल येताच पोलीस प्रशासन ॲक्शन मोडवर आले असून याप्रकरणी माता रमाबाई मार्ग (एमआरए मार्ग) पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गेल्या महिन्यातही आरबीआयला धमकी मिळाली होती. मात्र सातत्याने वाढत चाललेल्या धमक्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आले आहे.

## पाकिस्तानची मुलगी बनली भारताची सून, चर्चा तर होणारच!

जयपूर : भारत-पाकिस्तानमध्ये राजकीय आणि राजनयिक संबंध चांगले नाहीत. म्हणूनच दोन्ही देशामध्ये राहणाऱ्या लोकांमध्ये होणारे विवाह चर्चेचे ठरतात. काही महिन्यांपूर्वी सीमा हैदर आणि सचिन मीना ही जोडी आपल्या लग्नामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांमध्ये चर्चेत आली होती. आता पुन्हा एकदा अशीच एक जोडी चर्चेत आली आहे.

पाकिस्तानातील उमरकोट येथील सोनगढ भागातील शिवदान सिंग सोढा यांची नात नीतूराज हिचा विवाह राजस्थानमधील पिलीबंगा येथील ठाकूर किशोर शेखावत यांचा मुलगा उदयवीर सिंह याच्याशी झाला. या शाही विवाह सोहळ्यानंतर पाकिस्तानची मुलगी भारताची सून बनली आहे. त्यामुळं या लग्नाची सध्या देशभरात जोरदार चर्चा सुरू आहे.

## नाशकात थंडीची हुडहुडी; शाळा एक तास उशिराने भरणार

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी** : जिल्ह्यात गेल्या आठ दिवसांपासून तापमानाचा पारा १० अंशांपर्यंत खाली आलाय. सकाळी सात वाजता शाळेत जाताना लहान मुलांचे हाल होत आहेत, यासंदर्भात नाशिक महापालिका शिक्षण विभागाने विद्यार्थींचे आरोग्य लक्षात घेता महापालिकेच्या सर्व शाळा एक तास उशिराने म्हणजे सकाळी सातऐवजी आठ वाजता भरवण्याचे आदेश जारी केलेत. या निर्णयाचे विद्यार्थ्यांसोबतच पालकांनीदेखील कौतुक केलंय.



सकाळी वातावरणात धुके : नाशिकमध्ये गेल्या काही दिवसांपासून सकाळी आणि रात्री तापमानाचा पारा १० ते ८ अंशांपर्यंत खाली येतोय. तसेच सकाळी वातावरणात धुके असल्याने स्कूल व्हॅन आणि बस चालकांना वाहन चालवणे कठीण झालंय. अशातच थंडीमुळे विद्यार्थी आजारी पडत असून, वर्गातील पटसंख्यादेखील कमी दिसून येतेय. मुलांना झोपेतून उठवण्यापासून त्यांना व्हॅनपर्यंत नेण्यासाठी पालकांनादेखील धावपळ करावी लागत आहे. अनेक विद्यार्थी झोपेतून उठण्यास कंटाळा करीत असल्याने मुलांच्या आईंना त्यांना समजून सांगण्यासाठी कसरत करावी लागतेय. नाशिक महापालिका शिक्षणाधिकाऱ्यांनी महापालिकेच्या १०० शाळा तसेच खासगी शाळा उशिरा भरवण्याचे आदेश दिलेत. त्यामुळे आता शाळा सात ऐवजी आठ वाजता भरण्यास सुरुवात झालीय. या निर्णयाचे विद्यार्थी तसेच पालकांनी कौतुक केलंय.

गारव्यामुळे मुलांना सर्दी, खोकला यांसारखा त्रास : गेल्या आठ ते दहा दिवसांपासून नाशिकमध्ये थंडी वाढलीय, अशात मुलांना सकाळी सात वाजता शाळेत जाण्यासाठी किमान एक ते दीड तास आधी उठावे लागत आहे. थंडी जास्त असल्याने मुलंदेखील अंथरुणातून उठण्यास कंटाळा करीत आहेत. तसेच गारव्यामुळे मुलांना सर्दी, खोकला यांसारखा त्रास देखील जाणवतोय. त्यामुळे आता एक तास उशिराने शाळा भरणार असून, मुलांच्या दृष्टीने हा चांगला निर्णय घेतलाय, असं एका मुलाच्या आईने सांगितलंय.

चांगली झोप मिळणार : एवढ्या थंडीत सकाळी उठवत नाही, या थंडीचा त्रास देखील होतो. दप्तरासोबत स्वेटर, हॅन्ड ग्लोज, कानटोपी, मास्क या सर्व गोष्टी शाळेत घेऊन जावं लागतं. वर्गातील मुलांना थंडी वाजते, त्यामुळे अभ्यासाकडे लक्ष लागत नाही. आता शाळेचे वेळापत्रक बदलले असून, एक तास उशिराने शाळा भरत आहे. त्यामुळे चांगली झोप मिळणार आहे, असं एका विद्यार्थिनीनं सांगितलंय. थंडी वाढल्याने वातावरणात गारवा वाढलाय. तसेच सकाळी रस्त्यावर दाट धुके असते, अशात वाहन चालवणेदेखील कठीण होतेय, त्यामुळे दरवर्षी थंडीच्या दिवसात शाळेची वेळ बदलायला हवी, असं व्हॅन चालक संघटनेचे अध्यक्ष अजीम सय्यद यांनी सांगितलंय.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील दोन्ही गट पुन्हा एकत्र आले पाहिजेत; रोहित पवारांच्या आईचे मोठे वक्तव्य

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : महायुती सरकारचा बहुचर्चित मंत्रिमंडळ विस्तार बाकी असला तरी महाराष्ट्रातील राजकीय वर्तुळाचे लक्ष सध्या मुंबईऐवजी दिल्लीतील घडामोडींकडे लागले आहे. कारण दिल्लीत बसलेल्या शरद पवार आणि भाजपच्या केंद्रीय मंत्र्यांमध्ये पडद्यामागे हातमिळवणीच्या वाटाघाटी सुरु असल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ माजली आहे. अशातच आता आमदार रोहित पवार यांच्या आई सुनंदा पवार यांच्या एका वक्तव्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.



सुनंदा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील दोन्ही गट पुन्हा एकत्र आले पाहिजेत, असे मत व्यक्त केले आहे. दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावे, ही कार्यकर्त्यांची इच्छा आहे, त्याचा आदर केला पाहिजे. दोन्ही पिढ्या कित्येक वर्षे आम्ही एकत्र राहतोय. मला ही वैयक्तिकरित्या वाटते की, एकत्र यावे. याबाबतचा निर्णय पवार साहेब आणि अजितदादाच घेतील. पवार साहेब यांचा काल वाढदिवस होता. कुटुंबातील सगळे त्यांना भेटण्यासाठी गेले होते यात गैर नाही. दोन्ही राष्ट्रवादी एकत्रित यावे ,अशी कार्यकर्त्याची इच्छा आहे, मलाही तसेच वाटतेय. राजकारणात कार्यकर्ता महत्वाचा असतो. त्यामुळे विखुरलेले राहण्यापेक्षा एकत्र येणे योग्य ठरेल. आम्ही स्वतंत्र काम करतो, कुटुंबीयांची ताकद आहे, त्यामुळे एकत्रित यावे अस मला ही वाटते.

नवीन लोकांना संधी दिली पक्षाने हे चांगले आहे. राज्यात आलेल्या विधानसभा निकालावर माझा विश्वास नाही. राज्यात एवढी नाराजी अनेक प्रश्नांवर असताना हे निकाल पटत नाही. अजितदादा भेटतील तेव्हा मी शुभेच्छा नक्की देईल, असेही सुनंदा पवार यांनी म्हटले.

दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याचे त्यांच्या विधानाच स्वागत करतो. रोहित पवार, जितेंद्र आव्हाड आणि खासदार कोल्हे यांना राष्ट्रवादी एकत्र यावे, वाटते का? हे आधी स्पष्ट करावं. आम्हाला वाटतं दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आले पाहिजे. तसे नसतं तर काल अजित दादा बुके घेऊन गेलेच नसते. त्यांनी त्यांच्या भूमिका मांडाव्या आम्ही आमच्या मांडू.. शेवटी वरिष्ठ नेते निर्णय घेतील, असे वक्तव्य अजितदादा गटाचे प्रवक्ते अमोल मिटकरी यांनी केले. त्यामुळे आता पुढे काय घडणार, याकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत.

## मला पदातून मुक्त करा, नाना पटोलेंचे दिल्लीत पत्र; विधानसभेतील पराभवानंतर मोठा निर्णय

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : लोकसभा निवडणुकीत काँग्रेस महाविकास आघाडीला महाराष्ट्रात मोठे यश मिळाले होते. त्यामध्ये, १३ जागांसह काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला होता. मात्र, विधानसभा निवडणुकांमध्ये काँग्रेससह महाविकास आघाडीचे पानीपत झाल्याचे पाहायला मिळाले. त्यामुळे, या पराभवाची जबाबदारी स्वीकारत नाना पटोले यांनी पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदावरून मला मुक्त करा, अशा आशयाचं पत्र नाना पटोले यांनी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना दिलं आहे. मला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष पदावर चार वर्षे पूर्ण झाली असून आता प्रदेश काँग्रेस कमिटी बरखास्त करावी, तसेच नवी कमिटी स्थापन करा, मला पदावरून मुक्त करा असे पत्रच नाना पटोलेंकडून मल्लिकार्जुन खर्गे यांना देण्यात आल्याची सूत्रांची माहिती आहे. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यामुळे नाना पटोले यांनी ही भूमिका घेतल्याचे समजते.

राज्यातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला केवळ १७ जागांवर यश मिळाले आहे. तर, महाविकास आघाडीला ४९ जागांवर विजय मिळाला. मात्र, भाजप महायुतीला तब्बल २३७ जागांवर विजय मिळाला असून भाजपने सर्वाधिक १३२ जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे, राज्यातील पराभवाची जबाबदारी स्वीकारत नाना पटोले यांनी आपल्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देऊ केल्याचं समजतं. त्याच अनुषंगाने त्यांनी मल्लिकार्जुन खरगे यांना पत्र लिहून जबाबदारीतून मुक्त करावे, गेल्या ४ वर्षांपासून मी काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष असल्याचंही त्यांनी म्हटलंय. राज्यातील विधानसभा निवडणुकांचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी जाहीर झाला. त्यामध्ये, काँग्रेस महाविकास आघाडीचे पानीपत झाल्याचे पाहायला मिळाले. या निकालानंतरच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पदावरुन नाना पटोले पायउतार होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. मात्र, नाना पटोले यांनी राजीनाम्याचा कुठलाही निर्णय घेतला नसल्याचे त्यांच्या कार्यालयातून स्पष्ट करण्यात आलं होतं. त्यानंतर, आता पुन्हा एकदा पटोले यांच्या राजीनाम्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यातच, नाना पटोले यांनी स्वत:च राष्ट्रीय अध्यक्षांना पत्र लिहून



प्रदेशाध्यक्ष पदातून पदमुक्त करण्याची विनंती केल्याची माहिती आहे. त्यामुळे, आता काँग्रेसचे वरिष्ठ नेते काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, काँग्रेसमध्येही नाना पटोले यांना काही बड्या नेत्यांचा अंतर्गत विरोध असल्याची माहिती आहे.

ईव्हीएमविरुद्ध आंदोलनाला दिला जोर

दरम्यान, निवडणूक निकालानंतर आता काँग्रेससह महाविकास आघाडीचे नेते ईव्हीएम विरोधात आंदोलन करत आहेत. त्यासाठी, नाना पटोले यांनी स्वत: माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावाला भेट देऊन ईव्हीएमविरोधी आंदोलनाला जोर देण्याचे काम केले. यावेळी, बॅलोट पेपरवर मतदान घेत असल्यास मी राजीनामा द्यायला तयार असल्याचेही त्यांनी म्हटले होते.

CMYK

## महाराष्ट्र वाल्मीकी गदिमा

मराठीतील श्रेष्ठ साहित्यिक, कवी, गीतकार, पटकथा लेखक ग. दि. माडगूळकर उर्फ ग. दि. मा यांची आज पुण्यतिथी. १ ऑक्टोबर १९१९ रोजी जन्मलेल्या गदिमांचे शिक्षण आटपाडी, कुंडल आणि औंध येथे झाले. गदिमा यांना लहानपणापासून लेखनाची आवड होती. जेष्ठ साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्याकडे त्यांनी काही काळ लेखनिक म्हणून काम केले त्याचा त्यांना खूप फायदा झाला. वि स खांडेकर यांचे सर्व पुस्तके त्यांनी वाचून काढले. वि. स. खांडेकर यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनीही लिहिण्यास सुरवात केली. त्यांनी कथा आणि कविता यांचे विपुल लेखन केले. के. नारायण काळे यांचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काही काळ काम केले. भक्त दामाजी आणि पहिला पाळणा या चित्रपटासाठी त्यांनी गीतलेखन केले. लोकशाहीर रामजोशी या गाजलेल्या चित्रपटासाठी त्यांनी गाणी लिहिली इतकेच नव्हे तर या चित्रपटाची कथा आणि संवादही त्यांनीच लिहिले हा चित्रपट खूप लोकप्रिय झाला. या चित्रपटाला खूप लोकप्रियता मिळाल्याने कवी आणि लेखक म्हणून त्यांचे नाव सर्वदूर पोहचले. या चित्रपटात त्यांनी छोटीशी भूमिकाही केली होती. त्यानंतर त्यांनी अनेक चित्रपटांसाठी पटकथा आणि गाणी लिहिली. त्यांच्या चित्रपटाच्या कथा वैविध्यपूर्ण होत्या. संवादही सोपे पण प्रेक्षकांच्या मनाला भिडणारे होते. त्यांनी दीडशेहून अधिक चित्रपटासाठी कथालेखन केले. त्यांनी मराठी चित्रपटांसाठी लिहिलेले गीते चैत्रबन ह्या नावाने संग्रहित आहे, तसेच त्यांनी लिहिलेल्या काही चित्रकथा ही मराठी चित्रकथा या नावाने प्रकाशित झाल्या आहेत. गदिमांच्या कवितेवर ज्ञानेश्र्वर, नामदेव, तुकाराम, आदी संतांच्या कवितेप्रमाणेच पंडिती आणि शाहिरी कवितेचेही सखोल संस्कार झाले होते, ह्याचा प्रत्यय त्यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या सुंदर घाटाच्या, परंतु प्रभावी गीतांतून येते. त्यांच्या कवितेतील अस्सल मराठमोळेपणामागेही हेच संस्कार दिसून येते. त्यांनी लोकगीते, समरगीते आणि बालगीतेही लिहिली. त्यांच्या गीतरामायणाने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. गीतरामायणाच्या कार्यक्रमाचे हजारो कार्यक्रम झाले अजूनही होत आहेत. गीतरामायण ऐकले नाही असा मराठी माणूस शोधूनही सापडणार नाही. लोकांना गीतरामायण इतके आवडले की लोकांनी त्यांना महाराष्ट्र वाल्मिकी ही पदवी दिली. ते कवी, लेखक तर होतेच पण उत्तम अभिनेतेही होते. पुढचं पाऊल, पेडगावचे शहाणे, लाखाची गोष्ट, वऱ्हाडी आणि वाजंत्री या चित्रपटात त्यांनी केलेल्या भूमिका संस्मरणीय ठरल्या. गदिमांनी केवळ मराठीतच नव्हे तर हिंदीतही आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. त्यांच्या कथेवर आधारित २५ हिंदी चित्रपटाची निर्मिती झाली. दो आँखे बाराह हाथ, नवरंग, गुंज उठी शहनाई, तुफान और दिया, आदमी सडक का या गाजलेल्या हिंदी चित्रपटांची पटकथा त्यांनीच लिहिली. गुरुदत्त यांचा प्यासा, राजेश खन्ना यांचा अवतार, अमिताभ बच्चन, राणी मुखर्जी यांचा ब्लॅक या चित्रपटांच्या मूळ कथाही गदिमा यांच्याच. चार दशकांहुन अधिक काळ रसिकांच्या मनावर राज्य केलेल्या गदिमांचा पद्मश्री पुरस्कार देऊन सरकारने गौरव केला. १९७३ साली यवतमाळ येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्याच्या विधानपरिषदेचेही ते सदस्य होते. १४ डिसेंबर १९७७ रोजी गदिमांचे निधन झाले. गदिमांसारखी बहुमुखी प्रतिमा असलेले रत्न मराठी मातीत जन्माला आले हे महाराष्ट्राचे भाग्यच. आपल्या बहुमुखी प्रतिमेने मराठी साहित्याची त्यांनी जी सेवा केली त्यासाठी मराठी माणूस कायम त्यांचा ऋणी राहील. बहुमुखी प्रतिमा आणि अष्टपैलू व्यक्तिमत्वाच्या जोरावर रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या गदिमांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# मूलभूत हक्कांचे संरक्षण करणारे राज्य मानवी हक्क आयोग




**नंदकुमार बलभीम वाघमारे**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे

संयुक्त राष्ट्राकडून दरवर्षी १० डिसेंबर रोजी मानवी हक्क दिन साजरा केला जातो. मानवी हक्कांची संकल्पना नैसर्गिक विधी ह्या संकल्पनेचे अपत्य आहे. जन्मानेच माणूस काही हक्क घेऊन येतो. त्या गृहीतकृत्यांवर ह्या हक्कांची मांडणी करण्यात येते. मानवी हक्क किंवा मानवी अधिकार हे मानवाचे मूलभूत हक्क आहेत. मानवी हक्क हे जागतिक असून सर्वांना समान असतात. हे हक्क उपजत असतात किंवा कायदेशीर असू शकतात. खाली दिलेले जीवनाधिकार, यातनांपासून मुक्तता, गुलामगिरीपासून मुक्तता, कोर्ट सुनावणीचा अधिकार, भाषण स्वातंत्र्य, वैचारिक व धार्मिक स्वातंत्र्य हे काही मानवी हक्क प्रमुख हक्क मानले जातात. अशा या मानवी हक्कांचे उल्लंघन होत असल्यास महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाकडे दाद मागता येते. कोणत्याही शुल्काशिवाय व वकिलांशिवाय आयोगाकडे तक्रार करता येते.

मानवी हक्क म्हणजे सर्व मानवांचे अनन्य संक्राम्य असलेले मूलभूत हक्क. मानवी हक्क हे देश, स्थान, भाषा, धर्म, मानववंशीय उद्गम, लिंग, जात, जमात इत्यादींच्या पलीकडे सार्वत्रिक अशा स्वरूपाचे आहेत. राष्ट्रसंघाच्या (यूनो) परिषदांनुसार व संकेतांनुसार व मानवी हक्काच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये भर दिल्यानुसार कोणत्याही देशामध्ये कोणतीही राजकीय, आर्थिक किंवा सांस्कृतिक पद्धती अंमलात असली तरीही सर्व मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे व त्यांना प्रोत्साहन देणे त्या–त्या राज्याचे कर्तव्य आहे.

त्यानुसार भारतामध्ये मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ अस्तित्वात आला. या अधिनियमाचे उद्दिष्ट सीमित असले, म्हणजेच मानवी हक्क आयोग हा केवळ सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्कांच्या उल्लंघनाचीच चौकशी करू शकतो आणि केवळ शिफारस करणारे आदेशच जारी करू शकतो तरीही महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने त्यांचे मर्यादित अधिकार व मर्यादित अधिकार क्षेत्र यामध्येही आयोगाला प्राप्त झालेल्या मानवी हक्क अधिकारांच्या उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे व स्वतःहून पुढाकार घेऊन चौकशी करणे याद्वारे सार्वजनिक सेवकांनी केलेल्या मानवी हक्काच्या उल्लंघनामध्ये लक्ष घातले आहे. आयोग मानवी हक्कांच्या उल्लंघनाबाबतची गाऱ्हाणी व तक्रारी याकडे लक्ष देत आहे. महाराष्ट्र राज्यात मानवी हक्कांच्या स्थितीमध्ये सुधारणा करणे व सर्व समाजाच्या कल्याणासाठी मानवी हक्कांच्या संरक्षणाचे संवर्धन करणाऱ्या संस्कृतीला प्रोत्साहन देणे यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग प्रयत्न करीत आहे.

**आयोगाचा परिचय**

मानवी हक्क म्हणजे मानवी वर्तणुकीच्या दर्जाची विवरण करणारी काही नैतिक तत्त्वे किंवा रिवाज होय. या मानवी हक्कांचे आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये नियमितपणे संरक्षण होते.

मानवी हक्क सार्वत्रिक असणे, ते हक्क सर्व जगभरात समान असणे हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क कायद्यांचा पायाभूत मानक ठरला. १९४८ साली मानवी हक्कांच्या सार्वत्रिक घोषणांमध्ये या तत्त्वावर पहिल्यांदा भर देण्यात आला व अनेक आंतरराष्ट्रीय मानवी हक्क संमेलने, ठराव व घोषणांमध्ये या तत्त्वांचा पुनरुच्चार करण्यात आला आहे. भारताच्या घटनेमध्ये सुद्धा मानवी हक्कांच्या सर्व सार्वत्रिक घोषणेचा मूलभूत हक्क म्हणून समावेश केला आहे. भारताच्या संसदेने मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ पारित केला. हा अधिनियम मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध सुरक्षितता प्रदान करतो. या अधिनियमामध्ये राष्ट्रीय मानवी हक्क आयोग व राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्याचा तसेच जिल्हा स्तरावर मानवी हक्क न्यायालय स्थापन करण्याची तरतूद आहे.

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगा बद्दल**

आंतरराष्ट्रीय संकेत व मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३ यांच्यानुसार महाराष्ट्र राज्यामध्ये मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना ६ मार्च २००१ रोजी झाली.

आयोगावर एक अध्यक्ष व दोन सदस्य आहेत. आयोगाकडे एक सचिव, एक विशेष पोलीस महानिरीक्षक व एक प्रबंधक आहेत. आयोगाचे पुढीलप्रमाणे तीन विभाग आहेत : (१) विधी विभाग, (२) प्रशासन विभाग, (३) अन्वेषण विभाग. आयोगाकरिता नियमित ५४ पदे मंजूर असून याशिवाय दोन वर्षांच्या कालावधीसाठी १५ काल्पनिक पदे मंजूर केली आहेत. अशाप्रकारे ६९ पदे निर्माण करण्यात आली आहेत.आयोगाचे कार्यालय प्रशासकीय अधिकारी महाविद्यालय आवार, ९, हजारीमल सोमाणी मार्ग, सी. एस. टी. समोर, मुंबई–४०० ००१ येथे आयोगाचे कार्यालय शासनाच्या गृह विभागाच्या नियंत्रणाखाली कार्यरत आहे.

**व्हिजन मिशन**

मानवी हक्कांचे संरक्षण (सुधारणा) कायदा, २००६ द्वारे सुधारित केल्यानुसार मानवी हक्कांचे संरक्षण कायदा , १९९३ म्हणून स्थापित केले गेले आहे.

आयोगाची जबाबदारी जनतेमध्ये मानवी हक्क जागरुकता पसरवणे आणि मानवी हक्क साक्षरतेच्या क्षेत्रातील सर्व भागधारकांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे हे आहे.

मानवी हक्कांना घटनेने हमी दिलेले किंवा मूर्त स्वरूप दिलेले व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समानता आणि प्रतिष्ठेशी संबंधित अधिकार म्हणून परिभाषित करते.

**आयोगाची रचना**

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही वैधानिक संस्था आहे. त्याची रचना खालीलप्रमाणे –

जी व्यक्ती एखाद्या उच्च न्यायालयाची मुख्य न्यायाधीश किंवा न्यायाधीश होती अशी व्यक्ती आयोगाची अध्यक्ष असेल.अशी व्यक्ती की जी उच्च न्यायालयाची न्यायाधीश होती किंवा आहे किंवा राज्यातील जिल्हा न्यायालयामध्ये न्यायाधीश होती किंवा आहे आणि त्या व्यक्तीला जिल्हा न्यायाधीश म्हणून किमान सात वर्षे अनुभव आहे, अशी व्यक्ती आयोगाची सदस्य असेल,

अशा व्यक्तीला आयोगाचा सदस्य नेमला जाईल की ज्या व्यक्तीला मानवी हक्कासंबंधित बाबींच्या संबंधित अनुभव असेल किंवा मानवी हक्कासंबंधित बाबींचे ज्ञान असेल.

**आयोगाचे कार्य**

लोकसेवकाकडून मानवी हक्क भंग झाला आहे वा त्या बाबतीत त्यांनी अपप्रेरणा दिली आहे वा मानवी हक्क भंगाचा प्रतिबंध करण्यात दुर्लक्ष केले आहे, अशा प्रकरणी स्वप्रेरणेने वा ग्रस्त व्यक्तीकडून तक्रार आल्यावर चौकशी करणे.

न्यायालयाकडे प्रलंबित असलेल्या कार्यवाहीबाबत मानवी हक्क भंग झाल्याची तक्रार असेल, तर अशा बाबतीत संबंधित न्यायालयाच्या मान्यतेने हस्तक्षेप करणे.

कैद्यांच्या राहणीमानाची पाहणी व अभ्यास करण्यासाठी राज्य शासनाला सूचना देऊन, तुरुंगांना वा ज्या संस्थेत कैद्यांना उपचारार्थ वा सुधारण्यासाठी वा संरक्षणाखाली ठेवले असेल, अशा ठिकाणांना भेटी देणे.

मानवी हक्क संरक्षणार्थ राज्यघटना वा कोणत्याही विद्यमान कायद्याखाली पुरविण्यात आलेल्या सुरक्षिततेसंबंधीच्या तरतुदींचा आढावा घेणे व अशा तरतुदींच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

मानवी हक्कांचा संकोच करणाऱ्या अतिरेकी व इतर घटकांचा आढावा घेणे व योग्य ती उपाययोजना सुचविणे.

मानवी हक्कांवरील प्रबंध व आंतरराष्ट्रीय कायदेशीर शोधग्रंथांचा अभ्यास करणे व त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे.

मानवी हक्कांसंबंधी संशोधनाचे काम हाती घेणे व प्रोत्साहन देणे.

समाजातील विविध प्रवर्गात मानवीहक्कांविषयी जाणीव निर्माण करणे आणि प्रसिद्धी व प्रसार माध्यमे, संमेलने व अन्य उपलब्ध साधनांद्वारे मानवीहक्क संरक्षणाच्या उपलब्ध तरतुदींविषयी जागृती वाढावी म्हणून प्रयत्न करणे.

मानवी हक्क क्षेत्रात कार्य करणाऱ्या अशासकीय संघटना व संस्थांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे.

**आयोगाकडे तक्रार करतानाची कार्यपद्धती किंवा आयोग स्वतःहून कृती करील तेव्हाची कार्यपद्धती**

१. मानवी हक्कांचा भंग झाल्याची तक्रारी पीडित व्यक्ती किंवा त्या व्यक्तीतर्फे अन्य व्यक्ती तक्रार दाखल करू शकेल. सदर तक्रार मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत करता येईल. सदर तक्रार ऑनलाईन किंवा टपालाने सादर करता येईल.

२. तक्रार करताना कोणतेही शुल्क द्यावे लागणार नाही, कोणतेही कोर्ट फी तिकीट लावावे लागणार नाही. वकील नेमण्याची गरज नाही.

३. कोणत्याही शासकीय सेवकांविरुद्ध तक्रार करायची असेल तर ती आयोगाच्या अध्यक्षांना उद्देशून करायची असते व त्यामध्ये खालील तपशील असणे आवश्यक आहे:–

तक्रारदाराचे पूर्ण नाव,तक्रारदाराचा पूर्ण टपालाचा पत्ता, टेलिफोन क्रमांक / ई–मेल क्रमांक, घटनेची तारीख व स्थळ, घटना केव्हा घडली ती वेळ, मानवी हक्कांच्या उल्लंघनाच्या घटनांचा तपशील स्पष्ट करा.

कोणत्या शासकीय सेवकाविरुद्ध / शासकीय विभागाविरुद्ध / शासकीय संस्थेविरुद्ध / शासकीय प्राधिकरणाविरुद्ध तक्रार केली जात आहे?

सदर बाब कोणत्याही न्यायालयात,राष्ट्रीय मानव हक्क आयोगात, न्यायासनात किंवा अन्य वैधानिक मंचाकडे प्रलंबित आहे काय ?

**आयोगाकडे येण्याची कारणे**

संस्थात्मक स्वायत्तता व स्वांतत्र्य
सोपी उपलब्धता
कोणतेही शुल्क आकारले जात नाही
कमी किचकट कार्यपद्धती
त्वरित न्याय
कोणत्याही व्यावसायिक वकिलाच्या सहाय्याची गरज नाही

**आयोगाचा पत्ता व संपर्क**

पत्ता : हजारीमल सोमाणी मार्ग, सीएसएमटी स्टेशन, मुंबई – ४०० ००१

वेबसाइट दुवा : http://www.mshrc.gov.in

दूरध्वनी : ०२२२२०७६४०८

ईमेल : complaint-mshrcgov.in

नागरिकांनी आपल्या मानवी हक्कांसंदर्भात सजग राहणे आवश्यक आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास त्यांना न्याय देण्याचे राज्य मानवी हक्क आयोग हे एक हक्काचे ठिकाण आहे. मानवी हक्कांबाबत जनजागृती करणे व तळागाळातील नागरिकांपर्यंत मानवी हक्कांची अंमलबजावणी होण्यासाठी आयोग कार्यरत आहे. त्यामुळे जर कोणाच्या मानवी हक्कांचे उल्लंघन झाले असे वाटल्यास त्या नागरिकांनी आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधून आपल्या हक्कांचे संरक्षण करू शकता.

## झुकेगा नही साला! आरामात कॉफीचा घोट घेतला, बायकोला किस केलं अन् अल्लू अर्जुन पोलिसांच्या स्वाधीन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : जगभरात आपल्या स्टारडमनं आग लावणाऱ्या अल्लू अर्जुनला 'पुष्पा २: द रूल'चा प्रिमीयर शो चांगलाच भोवला आहे. हैदराबादमधील संध्या थिएटरमध्ये आयोजित करण्यात आलेल्या प्रिमीयर शोवेळी झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी अल्लू अर्जुनला अटक करण्यात आली आहे. दरम्यान, या घटनेत एका महिलेचा मृत्यू झाला होता, तर तिचा लहान मुलाला गंभीर दुखापत झाली होती. याच प्रकरणी चौकशीसाठी अल्लू अर्जुनला पोलिसांनी अटक केल्याची माहिती मिळत आहे. ज्यावेळी अल्लू अर्जुनला अटक करण्यासाठी पोलीस पोहोचले, त्यावेळचा व्हिडीओ सध्या समोर आला आहे. अल्लू अर्जुनला अटक करण्यासाठी ज्यावेळी पोलीस त्याच्या घरी पोहोचले त्यावेळी तो घराखाली अनवाणी पायांनी फिरत होता. त्यानंतर तो तसाच पोलिसांसोबत घरी गेला. त्यानं आपले कपडे बदलले, कॉफिचा कप घेऊन घराखाली आला. अल्लू अर्जुननं कॉफी घेतली. त्यावेळी त्याची बायको त्याच्यासोबत होती.

आजूबाजूला पोलीसही उपस्थित होते. अल्लू अर्जुननं शांतपणे कॉफी संपवली, बायकोच्या कपाळावर किस केलं आणि पोलिसांसोबत निघाला. अल्लू अर्जुन पोलिसांसोबत घरातून जातानाचा व्हिडीओ सध्या व्हायरल झाला आहे. अल्लू अर्जुनला पोलीस अटक करण्यासाठी गेले, त्यावेळी तो घराखाली होता. त्याच्या पायात चप्पल नव्हती, तसेच, तो हाफ पॅन्ट आणि टीशर्ट घालून फिरत होता. पोलीस आल्यानंतर तो घरी गेला आणि कपडे बदलेले. त्यानंतर त्यानं बायकोचा निरोप घेऊन पोलिसांसोबत निघाला. पण, यावेळी अल्लू अर्जुननं घातलेल्या कपड्यांनी सर्वांचं लक्ष वेधलं आहे. अल्लू अर्जुननं पुष्पा २ चं प्रमोशन करणारं व्हाईट कलरचं हुडी आणि व्हाईट पॅन्ट घातली होती.

## पंतप्रधान मोदींवर टीका करण्याची उद्धव ठाकरेंची औकात नाही; चंद्रशेखर बावनकुळे यांची जळजळीत टीका

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : ज्यांनी सत्तेसाठी हिंदुत्वाची कास सोडली आणि काँग्रेसच्या मांडीला मांडी लावून बसले, ते उद्धव ठाकरे आज हिंदूंच्या रक्षणाबद्दल बोलत आहेत. उद्धव ठाकरे तुमचं हिंदू प्रेम किती बेगडी होतं हे तुमच्या अडीच वर्षाच्या सत्तेच्या काळात जनतेनं बघितलं. पालघरमध्ये झालेलं साधूंचं हत्याकांड आणि तुमची हिंदूविरोधी भूमिका महाराष्ट्रानं बघितली. बांगलादेशमधील हिंदूच्या पाठीशी भाजप उभी आहे. त्याचसाठी केंद्र सरकारनं 'नागरिकत्व दुरूस्ती विधेयक' मंजूर केलं. त्यावेळी तुम्ही मात्र काँग्रेसला घाबरून राज्यसभेत बोटचेपी भूमिका घेतली होती. परिणामी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करण्याची उद्धव ठाकरेंची औकात नाही, अशा तिखट शब्दात भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आक्रमक पवित्रा घेत शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे.

यातून तुमची तथाकथित
हिंदुत्ववादी निष्ठा समजते

भाजपासाठी हिंदुत्ववाद हा राजकारणाचा विषय नाही, तर ती आमची श्रध्दा, प्राण आणि श्वास आहे. ज्यांनी सत्तेसाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे प्रखर हिंदुत्ववादी विचार सोडले. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे यांचे चिरंजीव प्रियांक खरगे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर केलेली टीका, तसेच कर्नाटक विधानसभेतून सावरकरांची प्रतिमा काढण्याचा काँग्रेस नेते उद्दामपणा करता तुम्ही अवाक्षर काढले नाही. यातूनच तुमची हिंदुत्ववादी तथाकथित निष्ठा समजते. तुम्हाला विश्वगुरू पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्याबद्दल बोलण्याचा अधिकार नाहीच पण तुमची ती लायकी देखील नाही. अशा प्रखर शब्दांत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी एक्सवरून घणाघाती टीका केली आहे.

नेमकं काय म्हणाले होते उद्धव ठाकरे

बांगलादेश अल्पसंख्यांक असलेल्या हिंदू धर्मियांवर सातत्याने हल्ले होत आहेत. यामुळे बांगलादेशमधील हिंदूसह संपूर्ण जगभरातील हिंदू धर्मीय चिंतेत आहेत. महाराष्ट्रात बांगलादेशच्या मुद्द्यावरून विरोधकांनी मोदी सरकारवर जोरदार हल्लाबोल केलाय. आता शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपवर घणाघात केलाय.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### मस्जिदच्या शेजारील लॉजिंग बंद व्हावं यासाठी लॉज समोर मुस्लीम बांधवांचे धरणे आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील तुर्भे नाक्यावरील मच्छी मार्केट जवळ असलेल्या जुन्या मस्जिदला लागूनच विनायक रेसिडेन्सी नावाचे लॉजिंग उभारले आहे. सदर हे लॉजिंग मस्जिद लगतच असल्यामुळे आमच्या श्रद्धेला ठेच पोहचत असून हा प्रकार आम्हाला वेदना देणारा आहे आणि मुळात या लॉजिंगला नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही परवानगी नाही तरीही हे लॉजिंग सर्रासपणे चालवले जात आहे. या लॉजिंग मुळे आमच्या भावना दुखावल्या जातं असून हे पूर्णपणे बंद झालं पाहिजे यासाठी या लॉज समोर मुस्लीम बांधवांनी धरणे आंदोलन केले आहे.

### केडीएमसीकडून २३५ कोटी मालमत्ता कराची वसुली



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतून आतापर्यंत २३५ कोटी मालमत्ता कराची वसुली झाली आहे. मालमत्ता कर न भरणाऱ्या १६० लोकांविरोधात जप्तीची कारवाई करण्यात आली आहे तर ८० पाणी कनेक्शन कट करण्यात आले असल्याची माहिती केडीएमसीच्या उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी दिली आहे.

### प्रादेशिक परिवहन कार्यालयातील प्रलंबित प्रतिवेदन/ई-चालनाबाबत आज राष्ट्रीय लोकअदालत

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड या कार्यालयातील प्रलंबित प्रतिवेदन/ई-चालन यासंदर्भात जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे शनिवार १४ डिसेंबर २०२४ रोजी लोकअदालत आयोजीत केली आहे. सदरील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे आयोजीत केलेल्या लोकअदालतमध्ये वाहन चालक-मालक यांनी उपस्थित रहावे आणि तडजोड पद्धीतीने आपल्या वाहनासंबंधी प्रकरणाचा निपटारा करावा. सर्वांनी या उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत संधी

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येते. छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, येथे महाराष्ट्र शासनातर्फे युवक व युवतीसाठी ३० डिसेंबर २०२४ ते ८ जानेवारी २०२५ या कालावधीत एस.एस.बी. कोर्स क्र. ६० आयोजित करण्यात येत आहे. या प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थींना निशुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते.

मुंबई शहर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी सैन्यदलातील अधिकारी पदाच्या संधीसाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय मुंबई शहर येथे २४ डिसेंबर २०२४ रोजी मुलाखतीस हजर राहण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे. मुलाखतीस Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवरहल एस.एस.बी.-६० कोर्ससाठी (किंवा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत यावे.

एस.एस.बी. वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी खाली नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येतांना सोबत घेऊन यावे.

कंम्बाईंड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन अथवा नॅशनल डिफेंस केडमी एक्झामिनेशन पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी 'उ' सर्टिफिकेट '-' किंवा 'इ' ग्रेडमध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एसएसबीसाठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी. मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे.

विद्यापीठ प्रवेश प्रणालीसाठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एस.एस.बी. साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ईमेल आय डी training.pctcnashikgmail.com किंवा दूरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा हॉट्सअप क्र. ९१५६०७३३०६ यावर प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीद्वारे करावा असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मुंबई शहर यांनी केले आहे.

# महाराष्ट्र राज्य विकास कर्ज २०२५ ची ८.१३% टक्के दराने परतफेड

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासनामार्फत ८.१३% महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ अदत्त शिल्लक रकमेची १३ जानेवारी, २०२५ पर्यंत देय असलेल्या व्याजासह दि. १४ जानेवारी, २०२५ रोजी सममूल्याने परतफेड करण्यात येणार असल्याचे वित्त विभागाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

उपरोक्त दिनांकास सुटी जाहीर केल्यास, राज्यातील अधिदान कार्यालय, कर्जाची परतफेड अगोदरच्या कामाच्या दिवशी करेल. या कर्जावर दि. १४ जानेवारी, २०२५ पासून व त्यानंतर कोणतेही व्याज अदा करण्यात येणार नाही.

दुय्यम सर्वसाधारण खातेवही लेखा किंवा रोखे प्रमाणपत्र यांच्या स्वरुपातील शासकीय रोख्यांच्या नोंदणीकृत धारकाकडील मुदत समाप्ती उत्पन्नाचे प्रदान हे, इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत जमा निधीची सुविधा असलेल्या कोणत्याही बँकेतील धारकाच्या खात्यात जमा करुन त्याच्या बँक खात्याचे संबधित तपशिलांसह प्रदानादेशाव्दारे करण्यात येईल. रोख्यांच्या बाबतीतील प्रदान करण्यासाठी, अशा रोख्यांचा मूळ वर्गणीदार किंवा यथास्थिती उत्तरवर्ती धारक, बँकेकडे किंवा कोषागाराकडे किंवा भारतीय स्टेट बँक शाखेच्या उप-कोषागाराकडे किंवा यथास्थिती त्यांच्या दुय्यम बँकांकडे जर त्यांना व्याज प्रदान करण्यासाठी मुखांकित करण्यात आले असल्यास त्यांची नोंदणी करण्यात आली असल्यास त्याच्याकडे, त्यांच्या बँक खात्याचा संबंधित तपशील सादर करतील.




तथापि, बँक खात्याच्या संबंधित तपशिलाच्या/ इलेक्ट्रॉनिक माध्यमामार्फत निधी जमा करण्याच्या आदेशाच्या अभावी, नियत दिनांकास परतफेड करणे सुलभ व्हावे यासाठी, ८.१३% महाराष्ट्र राज्य विकास कर्ज, २०२५ च्या धारकांनी, लोक ऋण कार्यालयात २० दिवस अगोदर त्यांचे रोखे सादर करावेत. रोख्यांच्या मागील बाजूस प्रमाणपत्रावरील देय मुद्दलाची रक्कम मिळाली. असे यथोचितरीत्या नमूद करुन ते रोखे परतफेडीसाठी सादर करावेत.

भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या कोणत्याही सहयोगी बँकांच्यामार्फत ज्या ठिकाणी कोषागाराचे काम केले जाते त्या ठिकाणी ते रोखे रोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपात असल्यास, ते संबंधित बँकेच्या शाखेत सादर करावेत आणि ते कोषागार किंवा उपकोषागार येथे सादर करु नयेत, याची विशेष नोंद घ्यावी.

रोख्यांची रक्कम प्रदान करण्यासाठी जी ठिकाणे मुखांकित करण्यात आली असतील त्या ठिकाणांखेरीज अन्य ठिकाणी ज्या रोखेधारकांना, रक्कम स्वीकारायची असेल, त्या रोखेधारकांनी ते रोखे नोंदणीकृत व विमाबद्ध डाकेने संबंधित लोक ऋण कार्यालयात यथोचितरित्या पाठवावेत. लोक ऋण कार्यालय हे, महाराष्ट्र राज्यात शासकीय कोषागाराचे काम करणाऱ्या भारतीय स्टेट बँकेच्या किंवा तिच्या सहयोगी बँकेच्या कोणत्याही शाखेत कोषागारात/उपकोषागारात देय असलेल्या धनाकर्षाद्वारे त्याचे प्रदान करील, असे सचिव (वित्तीय सुधारणा) श्रीमती शैला ए. यांनी प्रसिद्धीपत्राद्वारे कळवले आहे.

# नवी मुंबई येथे महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून संघटित करून त्यांना वैयक्तिक, सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विकसित करण्यासाठी ग्रामविकास व पंचायत राज विभागच्यावतीने महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राबविण्यात येते. या अभियानांतर्गत महिलांना कौशल्य व उद्योगाभिमुख प्रशिक्षणे देण्यात येतात. या महिलांनी उत्पादित केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ प्राप्त करून देण्यासाठी महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन - २०२४ चे आयोजन सिडको एक्झीबिशन सेंटर, वाशी, नवी मुंबई येथे १४ डिसेंबर ते २५ डिसेंबर पर्यंत करण्यात आले आहे.

उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून लाखो महिला सक्षम उद्योजिका म्हणून अनेक उत्पादनांची निर्मिती करत आहेत. त्यांनी तयार केलेली ही विविध उत्पादने देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचून त्यांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध व्हावी म्हणून दरवर्षी महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन आयोजित केले जाते. आतापर्यंत मुंबई, नवी मुंबई, नागपूर या ठिकाणी महालक्ष्मी सरस चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाला दरवर्षी चांगला प्रतिसाद नागरिकांकडून मिळतो.

महालक्ष्मी सरस चे नवी मुंबईतील हे दुसरे वर्ष आहे. या प्रदर्शनामध्ये साधारण महाराष्ट्रातील ३७५, इतर राज्यातून साधारण १०० असे एकूण ४७५स्टॉल असणार आहेत. तसेच खमंग आणि रुचकर शाकाहारी व मांसाहारी खाद्यपदार्थांचे ७५ स्टॉलचे मिळून भव्य असे 'फूड कोर्ट' असणार आहे.

या प्रदर्शनात अनेक प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू, हातमागावर तयार केलेले कपडे, वुडन क्राफ्ट, बंजारा आर्ट, वारली आर्टच्या वस्तू याशिवाय महिलांच्या आकर्षणाच्या अनेक प्रकारच्या ज्वेलरी, लहान मुलांसाठी लाकडी खेळणी व इतर राज्यातील दुर्मिळ वस्तूंची रेलचेल असणार आहे. या प्रदर्शनातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन शहरी नागरिकांना होणार आहे. राज्याच्या सर्व भागाची चव एकाच ठिकाणी भेट देणाऱ्यांना अनुभवता येणार आहे. सहकुटुंब भेट देणाऱ्या कुटुंबांचा विचार करून लहान मुलांना खेळवाडी (प्ले एरिया) उभारण्यात आला आहे. यावेळी या प्रदर्शनात अनुभव केंद्र असणार आहे.

नवी मुंबई परिसरात सुद्धा महालक्ष्मी सरस प्रदर्शनाची परंपरा निर्माण व्हावी या हेतूने सलग दुसऱ्या वर्षी वाशी येथे हे भव्य प्रदर्शन आयोजीत करण्यात आले आहे. या प्रदर्शनातून मोठ्या प्रमाणात विक्री होऊन ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाला व उद्योग व्यवसायाला हातभार लावण्यास मदत होईल त्यामुळे या प्रदर्शनाला आवर्जून भेट द्यावी असे आवाहन उमेद अभियानाचे मुख्य कार्यकारी अधिकारी रुचेश जयवंशी यांनी केले आहे.

# 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. सदानंद मोरे यांची विशेष मुलाखत




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' देण्याचा केंद्र सरकारने एतिहासिक निर्णय घेतला. त्याअनुषंगाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात या विषयावर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे यांच्या विशेष मुलाखतींचे प्रसारण होणार आहे.

केंद्र सरकारच्या या निर्णयाने मराठी भाषा सातासमुद्रापार जगभरात आणखी जास्त वेगाने आणि प्रभावीपणे पोहोचणार आहे. मराठी भाषेला मोठा इतिहास आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास, समृद्ध सांस्कृतिक वैभवाची जगभरात ओळख होणार असून ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असणार आहे. याचबरोबर मराठी भाषेच्या बोलींचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळणार असून, संशोधन आणि साहित्यसंग्रह करण्याच्या दृष्टीने चालना मिळणार आहे. त्याअनुषंगाने अभिजात भाषेचा दर्जा म्हणजे काय? आणि अभिजात दर्जा बहाल केल्यास मराठी भाषेत नेमके काय बदल होणार असून मराठी भाषेचा इतिहास काय आहे या विषयी 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमातून डॉ. सदानंद मोरे यांनी माहिती दिली आहे.


'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात डॉ. सदानंद मोरे यांची मुलाखत दोन भागात प्रसारित होणार आहे. या मुलाखतीचा पहिला भाग मंगळवार दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी तर दुसऱ्या भागाचे मंगळवार दि. २४ डिसेंबर २०२४ रोजी रात्री ८.०० वा. दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारण होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर ही मुलाखत ऐकता येणार आहे. ज्येष्ठ निवेदक दिपक वेलणकर यांनी ही मुलाखत घेतली आहे.

# 'दिलखुलास' कार्यक्रमात कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांची विशेष मुलाखत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'दिलखुलास' कार्यक्रमात 'नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी' याविषयावर कोल्हापूरातील शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के यांच्या विशेष मुलाखतीचे प्रसारण होणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (छएझ) २०20 लागू झाल्यापासून, भारतीय शैक्षणिक परिसंस्थेत परिवर्तनात्मक बदल घडवून आणले आहेत. त्याचा दूरगामी परिणाम अनेक बदलांमधून दिसून येत आहे. याधोरणांतर्गत अभ्यासक्रम- संरेखित शिक्षणाकडे वळणे, प्रादेशिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम, शिक्षणात तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण, व्यावसायिक आणि कौशल्याधारित शिक्षणाला प्रोत्साहन तसेच शैक्षणिक आणि व्यावहारिक ज्ञानातील अंतर कमी करणे आदी बाबींवर प्रामुख्याने भर देण्यात आला आहे. त्याअनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजी




विद्यापीठात या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येत आहे. याचबरोबर विद्यापीठात आणखी कोणकोणते नवनवीन अभ्यासक्रम व उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. याविषयी कुलगुरु डॉ. शिर्के यांनी 'दिलखुलास' कार्यक्रमातून माहिती दिली आहे.

'दिलखुलास'कार्यक्रमातून ही मुलाखत शनिवार दि. १४, सोमवार दि. १६, मंगळवार दि. १७ डिसेंबर २०२४ रोजी आकाशवाणीच्या सर्व केंद्रावरून व न्यूज ऑन एआयआर'या मोबाईल ॲपवर सकाळी ७.२५ ते ७.४० या वेळेत प्रसारित होणार आहे. कोल्हापूरच्या माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी ही मुलाखत घेतली आहे.

## 'उल्हासनगरची वाढणार सांस्कृतिक ओळख'

**उल्हासनगर/प्रतिनिधी :** उल्हासनगरातील कॅम्प एक परिसरात बाल शिवाजी उद्यान, कॅम्प तीनमध्ये बोट क्लब सुशोभीकरण, कॅम्प पाचमध्ये महिला भवन तसेच मराठी संस्कृती भवन उभारले जाणार आहे. त्यासाठी १५ कोटी ५० लाखांच्या निधीची गरज आहे. यात सरकारचा हिस्सा देण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काळात या प्रकल्पांचे काम लवकरच सुरू होणार आहे.

उल्हासनगर महापालिका क्षेत्रात शहरात भव्य क्रीडा संकूल, सांडपाणी योजना, पाणी योजना, ई-चार्जीग स्टेशन, परिवहन सेवा कार्यरत आहेत. यात आता तीन प्रकल्पांची भर पडणार आहे. उल्हासनगरच्या कॅम्प एक भागात बाल शिवाजी उद्यान, तसेच कॅम्प पाच भागात महिला आणि मराठी भवन उभारले जाणार आहे. कॅम्प एक भागातील उद्यानासाठी ५० लाखांचा आराखडा तयार केला होता. त्यानुसार महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नगरोत्थान महाअभियानांतर्गत जिल्हा वार्षिक योजनेतून या प्रकल्पासह इतर चार प्रकल्पांसाठी सरकारने आपला हिस्सा देण्यास मंजुरी दिली आहे. राज्य सरकारकडून या प्रकल्पांसाठी ७० टक्के तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांची ३० टक्के भागीदारीतून हे प्रकल्प पूर्ण होणार आहेत. या चारही प्रकल्पांसाठी १० कोटी ८५ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याला प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे.

# बीडमधील मस्साजोगच्या सरपंच हत्येप्रकरणी दोषींना फाशी द्या

## मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुणे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमध्ये सहभागी असणाऱ्या गुन्हेगारांना त्वरित फाशीची शिक्षा द्या अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच हा खटला जलद गती न्यायालयात (फास्ट ट्रॅक कोर्ट) चालवावा अशीही मागणी करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ सुहास दिवसे यांना दिलेल्या निवेदनात ही मागणी करण्यात आली आहे.तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना ईमेलद्वारे निवेदन पाठविण्यात आले आहे.

या वेळी मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक सतीश काळे गणेश देवराम गणेश कुंजीर नकुल भोईर यांनी



मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,संतोष देशमुख यांच्याकडे बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग या गावची उपसरपंचकी आणि सरपंचकी होती. सुरुवातीच्या टर्ममध्ये त्यांच्या पत्नी मस्साजोगच्या सरपंच झाल्या होत्या मात्र त्यानंतर ते स्वत: देखील सरपंच झाले. यावरुन त्यांची गावच्या राजकारणावर असलेली पकड समजते त्यांच्या पश्र्चात आई वडील भाऊ पत्नी मुलगा व मुलगी नातेवाईक आहेत. नुकतीच सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आल्याची दुर्दे वी घटना घडली आहे. त्यांना अत्यंत विदारक पद्धतीने मारहाण करण्यात आल्याचे व्हायरल झालेल्या फोटोवरून स्पष्ट होत आहे.

या प्रकरणात केज पोलीस ठाण्यात काही जणांविरोधात गुन्हा दाखल असून काही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. तर काही जण फरार असल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमध्ये संबधित असणाऱ्या सर्वांची कसून चौकशी करून सर्व आरोपींना अटक करावी हा खटला जलद गती न्यायालयात (फास्ट ट्रॅक कोर्टात) चालवून आरोपींना फाशीची शिक्षा देऊन देशमुख कुटुंबीयांना न्याय द्यावा. तसेच बीड जिल्ह्यात बिहार सारखी गुन्हेगारी प्रवृत्तीने वाटचाल सुरू आहे. त्याला आळा घालण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी लक्ष द्यावे या मागणीबाबत त्वरित कार्यवाही न झाल्यास मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने या घटनेचा महाराष्ट्रात रस्त्यावर उतरून तीव्र निषेध केला जाईल असा इशारा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने देण्यात आला.

## विविध वृत्त...

### आर्वी काचनगाव बस वेळेवर येत नसल्यामुळे विद्यार्थी त्रस्त



दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी** :वर्धा जिल्ह्यातील आर्वी काचनगाव हिंगणघाट येथे अल्लीपूरला नियमित बस नसल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. पाच वाजता विद्यार्थ्यांची शाळा सुटते मात्र बस ६:३० वाजले तरी येत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना बसची वाट बघत उभे रहाव लागते. याकडे हिंगणघाट बस डेपोने लक्ष देऊन अल्लीपूर येथे आर्वी काचगाव बस नियमित पाठवण्यात यावी अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली आहे.

### चनखोरे कॉलनी मेहकर येथे स्व. गोपीनाथराव मुंढे यांची जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर येथील वैजनाथ शिवमंदिराच्या सभागृहामध्ये स्व. गोपीनाथराव मुंढे यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी स्व.मुढे साहेब यांच्या प्रतिमेला पूजन पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी अभिवादन केले.

स्व. गोपीनाथराव मुंढे यांच्या जीवन कार्यावर प्रदीप ईलग व इतरांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमास भा.ज.पा. तालुका अध्यक्ष सारंग माळेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे गजानन गारोळे, वैजनाथ शिव मंदिराचे अध्यक्ष कैलासभाऊ चनखोरे, विजय वायाळ,हरिभाऊ पहाड, डॉ.माळेकर, निकम, आशिष तनपुरे, लक्ष्मणराव फुटाणकर, लक्ष्मणराव ठाकरे, डॉ. निलेश सानप,ताठे, मांटे, राजेश निकम, किशोर लादे, सुभाष नरवाडे, ॲड.विनोद नरवाडे, शिवशंकर मगर,आघाव ,भानुदास देव्हडे,संजय धुत,राजेश निकम,ॲड.निरंजन सांगळे,मुढे सर, केदार सर, अक्षय फुटाणकर,राहुल चोंढेकर,रवी गाडेकर,सौ.बोडखे काकू आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश शिंदे यांनी केले तर संजय बोडखे यांनी आभार मांनले.

### अखेर तीन महिन्यापासून थांबलेले ढाणकी रोडचे काम सुरु ; व्यापारी व नागरिकांच्या आंदोलनास यश



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी** :मागील तीन महिन्यापासून ढाणकी रोडचे काम थांबले होते,रस्त्याचे काम परत जलद गतीने सुरू करावे या मागणीसाठी काल ढाणकी रोड वरील व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन करत अधिकाऱ्यांना जाब विचारत तब्बल ढाणकी – उमरखेड रोड एक तास बंद करून उमरखेड च्या संजय टॉकीज जवळील ढाणकी रोड वर रास्ता अडवत आंदोलन केल्यामुळे पोलीस प्रशासनाने त्यांना स्थानबद्ध केलें असता,बांधकाम विभाग हरबडून जागा होत आंदोलन स्थळी येऊन बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी लेखी आश्र्वासन दिले होते आज ते आश्वासन बांधकाम विभागाने पूर्ण करून रोडचे थांबलेले काम सुरू केले आहे.

### रब्बी हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांची हरभऱ्याला पसंती

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा जिल्ह्यात यंदा सरासरीच्या अधिक पाऊस झाल्यामुळे रब्बीच्या पेऱ्यात गव्हाची वाढ अपेक्षित होती परंतु, शेतकऱ्यांनी यंदाही हरभऱ्याच्या पेऱ्याला पसंती दिली आहे. रब्बी हंगामात २ लाख २७ हजार हेक्टरवर जिल्ह्यात साधारणतः रब्बीचा पेरा होत असतो. त्या तुलनेत जिल्ह्यात यंदा १ लाख ५६ हजार ३६४ हेक्टरवर हरभऱ्याचा पेरा झाला आहे. कृषी विभागाने रब्बी हंगामामध्ये २ लाख २७ हजार हेक्टरवर पेरा होईल असे नियोजन केले होते. त्या अनुषंगाने रब्बी ज्वारी, गहू, मका, हरभरा, करडई, तीळ व अन्य रब्बी पिकांचे नियोजन केले होते. परंतु शेतकऱ्यांनी यंदा प्रथम प्राधान्य हे हरभरा पिकाला दिले आहे. पाऊसही समाधानकारक पडत असून, सिंचनाच्याही सोयी उपलब्ध झाल्या आहेत त्यामुळे जिल्ह्यातील रब्बीचा पेरा हा जवळपास अडीच लाख हेक्टरच्या घरात पोहोचला आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १०७ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे अशी माहिती जिल्हा कृषी अधिकारी मनोज कुमार ढगे यांनी दिली आहे.

# लोकनेते स्व गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंतीनिमित्त खळेगाव येथे स्मारकाचे उद्घाटन, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## पत्रकार देवानंद सानप यांच्या हस्ते झाले उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ





**लोणार/प्रतिनिधी** : लोकनेता प्रतिष्ठानच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला लोणार तालुक्यातील खळेगाव येथे स्वर्गीय लोकनेते गोपीनाथजी मुंडे साहेब यांच्या नियोजित स्मारकाचे उद्घाटन जेष्ठ पत्रकार देवानंद सानप यांच्या हस्ते करण्यात आले तसेच गावातील गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यामध्ये अनिल नागरे अकोला पोलीस निवड, मंगेश नागरे धाराशिव येथे तलाठी , सतीश नागरे नागपूर पोलीस , श्रीकांत नागरे न्यायालय लिपिक अमरावती ,मनीषा सरदार न्यायालय लिपिक परभणी, कल्याणी नागरे डी फार्म मध्ये उच्च श्रेणी प्राप्त, प्रवीण वायाळ एमबीबीएस साठी निवड, प्रतीक सानप आयआयटी मार्फत बेंगळूर येथे नामांकित कंपनीत निवड, राधेश्याम नागरे तलाठी रायगड, गणेश नागरे संभाजीनगर येथे वैद्यकीय अधिकारी पदी निवड, ओम प्रकाश सरोदे एमबीबीएस साठी निवड तसेच इतरही गुणवंताचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला यावेळी विदर्भ कोकण ग्रामीण बँक चे शाखा व्यवस्थापक स्वप्निलजी तायडे, क्षीरसागर ग्रामसेवक, गणेश सानप मुख्याध्यापक, शेजुळसर मुख्याध्यापक, मापारी सर मुख्याध्यापक, अशोक मुंडे पत्रकार तथा गावातील शेकडो नागरीक उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन लोकनेता प्रतिष्ठान खळेगाव तसेच समस्त गावकरी मंडळी खळेगाव यांनी केले होते.

## यंदा ५० % मिरचीच्या क्षेत्रात घट,परिणामी आवक कमी असल्याने मिरचीचे भाव वाढण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ



**नंदुरबार/प्रतिनिधी** : यावर्षी अतिवृष्टी व रोग प्रादुर्भावामुळे मिरचीचे उत्पादन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामुळे मिरचीच्या भावात वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यावर्षी जवळपास ५०% मिरची उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे.अतिवृष्टीमुळे मिरचीचे मोठे नुकसान झाले त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये मिरचीची आवकही कमी प्रमाणात होत आहे. रोज जवळपास ६० ते ७० वाहनातूनच ओली मिरचीची आवक होताना दिसत आहे. मिरचीचा हंगाम सुरू व्हायला आता सुरुवात झाली आहे.

अजून दोन ते तीन महिने हा हंगाम असाच सुरू राहील परंतु मागील वर्षाच्या तुलनेत यावर्षी मोठ्या प्रमाणात कृषी उत्पन्न बाजार समितीत आवक घटण्याची शक्यता आहे. मागील वर्षाच्या हंगामात जवळपास तीन लाख क्विंटल मिरचीची आवक कृषी उत्पन्न बाजार समितीत झाली होती. परंतु यावर्षी ही आवक एक लाख क्विंटल पर्यंत होण्याची शक्यता बाजार समितीकडून वर्तवण्यात आली आहे.

आवक घटल्यामुळे मिरचीचे भावही वाढण्याची शक्यता आहे. आतापर्यंत बाजार समितीत जवळपास ३५ हजार क्विंटल आवक मिरचीची झालेली आहे. आज रोजी ओल्या मिरचीचा भाव ४ हजार ते ५ हजार एवढा असून सुकी मिरचीचा भाव ६ हजार ते ११ हजार पर्यंत आहे. एकंदरीतच यावर्षी ५०% च्या वर मिरचीचे क्षेत्र घटल्यामुळे मिरचीचे भाव वाढण्याची दाट शक्यता कृषी उत्पन्न बाजार समिती कडून सांगण्यात आले आहे.परंतु हंगाम आताच सुरू झाल्यामुळे आज तरी भाव स्थिर असल्याचे सांगण्यात आले आहे.


### परभणीतील संविधान विटंबनेनंतर उसळलेल्या दंगलीबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करा – उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम

**नागपूर/प्रतिनिधी** : परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधानाच्या प्रतिकृतीला बाधा पोहचविल्याच्या घटनेबाबत महाराष्ट्र अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. घटनेची सखोल चौकशी करुन वस्तुनिष्ठ तपशीलवार अहवाल आयोगाकडे तत्काळ सादर करण्याचे निर्देश ॲड. मेश्राम यांनी पत्राव्दारे जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना दिले आहेत.

परभणी येथे १० डिसेंबर रोजी घडलेल्या घटनेबाबत वृत्तपत्रात जे वृत्तांकन आले व घटनेनंतरच्या उसळलेल्या दंगलीसंदर्भात तपशीलवार माहिती सादर करण्याचे लेखी पत्र निर्गमित करण्यात आले आहे. ड. मेश्राम हे परभणी जिल्हा दौरा लवकरच करणार आहेत.

परभणीच्या सामाजिक न्याय विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी या घटनेबाबत स्वतंत्र अहवाल तत्काळ सादर करावा असे देखील निर्देश आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी दिले.

## पलसिध्द महास्वामी मुर्ती प्राण प्रतिष्ठा वर्धापन दिन महोत्सवाचे आयोजन



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : श्रीमद् १००८ जगद्गुरू पलसिध्द महास्वामीजी यांचा मुर्ती प्राण प्रतिष्ठा वर्धापन दिन महोत्सवाचे आयोजन स्थानिक पलसिध्द धर्मपीठ शाखा डोणगांव च्या वतिने दि १६/१२ पासुन सुरु होत आहे, वर्धापन दिनानिमित्त श्री ष ब्र १०८ प पू शिवाचार्य रत्न,वेदान्ताचार्य सद्गुरू सिध्दलिंग शिवाचार्य स्वामीजी यांच्या प्रेरणेने व सद्गुरू सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज, सद्गुरू शिव चैतन्य शिवाचार्य महाराज हदगाव, सद्गुरू विश्र्व चैतन्य शिवाचार्य महाराज आष्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होत आहे,

जगद्गुरू पलसिध्द महास्वामीजी यांच्या मुर्तीवर रुद्राभिषेक,पलसिध्द चरित्रामृत व परमहस्य ग्रंथाचे पारायण, सामूहिक भजन व शिवपाठाचे आयोजन करण्यात आले आहे,शि भ प बबन आप्पा कौसडीकर, वेदमूर्ती बाळु स्वामी,हभप श्री सुभाष साखरे,शिभप श्री राजु स्वामी जामगव्हाणकर,हभप विठ्ठल महाराज नवले,शिभप सोनबा गुरजी शिराळे,शिभप आरतीताई कावरे, बोरीकर,हभप भागवत महाराज छत्रपती संभाजी नगर यांचे किर्तन व दि २३/१२ रोजी श्री सद्गुरू सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज सा खेर्डा यांचे प्रसादाचे किर्तन होणार आहे,

गुरुदिक्षा कार्यक्रम दि१९/१२ तर २२/१२ रोजी पारायण समाप्ती व श्री शि भ प नागेश महाराज स्वामी डोणगांव यांच्या टाळ आरती किर्तन व प्रभातफेरी मार्गाने पालखी सोहळा आयोजीत करण्यात आला आहे,मृदंगचार्य हभप गोपाल बाळासाहेब देशमुख,हभप अनिल महाराज आखाडे,गायनाचार्य शिभप नागनाथ महाराज ब्याळे हे सेवा देणार आहेत,या महोत्सवाचा परिसरातील सर्व वीरशैव लिंगायत समाजातील भावी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री पलसिध्द सेवा संघ व भावीक भक्त मंडळी यांनी केले आहे,

